|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र. कबचौउमवि/१८/७६८/२०१९ दि. १९/०७/२०१९

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,
मा. प्राचार्य,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी
संलग्नित अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व समाजकार्य
तसेच शिक्षणशास्त्र महाविद्यालये

**विषय :** तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नेमणुकीच्या कार्यपध्दतीबाबत.
संदर्भ : १) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा दि. १४ नोव्हेंबर, २०१८ चा शासन निर्णय
२) विद्यापीठाचे जा.क्र. कबचौउमवि/१८/६०१/२०१९ दि. ०६.०६.२०१९

महोदय/महोदया,

अनुदानित महाविद्यालयांच्या तासिका तत्वावर अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे सुधारित दर तसेच तासिका तत्वावर नेमणुका करावयाच्या कार्यपध्दतीबाबत शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि. १४ नोहेंबर, २०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. यासंदर्भात संदर्भिय पत्र क्र. २ नुसार तासिका तत्वावर नियुक्ती करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. सदरचा शासन निर्णयात नमूद केल्यानूसारच तासिका तत्वावर अध्यापकांच्या नेमणुका करण्याची कार्यवाही करावी. त्यात प्रामुख्याने खालील बाबी विचारात घ्याव्यात:

१. तासिका तत्वावरील अध्यापकांची नियुक्ती करण्यापूर्वी मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), जळगाव विभाग, जळगाव यांच्या कार्यालयाकडून संबंधित विषयाचा कार्यभार तपासून ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.
२. एका पूर्णवेळ रिक्त पदाकरिता फक्त दोनच तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नेमणुका करता येतील. एका अध्यापकाकडे जास्तीत जास्त ९ तासिकांचा कार्यभार सोपविता येईल.
३. संस्थेने विद्यापीठ मान्यतेने जाहिरात देऊन विद्यापीठ अनुदान आयोग/शिखर संस्था/ शासन यांनी वेळोवेळी विहित केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारक अध्यापकांची स्थानिक निवड समिती मार्फत निवड करावी. ज्यामध्ये संस्था प्रमुख/ प्राचार्य/ विभागप्रमुख व **एक बाहय विषय तज्ज्ञ असावा.**
४. तासिका तत्वावरील अध्यापकांची एका शैक्षणिक वर्षासाठी जास्तीत जास्त नऊ महिन्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात यावी व त्यास विद्यापीठाची मान्यता घेण्यात यावी. त्यानंतर ही नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.
५. तासिका तत्वावरील नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती असल्याने त्यास नियमित सेवेचे कोणतेही हक्क प्राप्त होत नाही. त्यामुळे भविष्यात सेवेत कायम करण्याची मागणी/ नियमित सेवेच्या कोणत्याही हक्काची मागणी करणार नाही. तसेच त्यास एकावेळी एकाच महाविद्यालयात काम करता येईल, असे हमी पत्र रु. १००/- स्टॅम्प पेपरवर संबंधित अध्यापकाकडून रुजू होते वेळी घेण्यात यावे.
६. सदरची जाहिरात स्थानिक पातळीवरील किमान दोन वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करावी आणि शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे मुलाखती घेवून प्रक्रिया करावी.

उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. : ०२५७-२२५७२७६, २२५७२७७ फॅक्स क्र. : ०२५७-२२५८४०३, ४०६,
Umavinagar, Jalgaon Tel Nos. : 0257-2257276 to 2257277, Fax Nos.:0257-2258403, 406
Web : www.nmu.ac.in E-mail : registrar@nmu.ac.in & dr-approval@nmu.ac.in

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

विद्यापीठाकडे तासिका तत्वावरील जाहिरात मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवितांना खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

१. मा. सहसंचालक कार्यालयाने कार्यभार मंजूर केल्याच्या पत्राची प्रत.

२. सदर पदे सहसंचालक कार्यालयाने तासिका तत्वावर भरण्यास मान्यता दिल्याच्या पत्राची प्रत.

३. बिंदुनामावलीची छायांकित प्रत.

४. जाहिरातीचा मसुदा (पाच प्रतीत)

५. सदर पदे भरण्याबाबत संस्थेने केलेल्या ठरावाची प्रत.

विद्यापीठाकडे तासिका तत्वावरील प्रस्तावांना मान्यतेसाठी सादर करतांना खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

१. मा. सह संचालक कार्यालयाने कार्यभार मंजूर केल्याच्या पत्राची साक्षांकित प्रत.

२. सदर पदे सहसंचालक कार्यालयाने तासिका तत्वावर भरण्यास मान्यता दिल्याच्या पत्राची साक्षांकित प्रत.

३. सदर पदे भरण्यास विद्यापीठाने जाहिरातीस मान्यता दिल्याची साक्षांकीत प्रत.

४. बिंदूनामावलीची छायांकित प्रत.

५. सदर पदे भरण्याबाबत संस्थेने केलेल्या ठरावाची प्रत.

६. परिशिष्ठ-क

७. नियुक्ती आदेश

८. रुजू अहवाल

९. दंडाधिकाऱ्यांच्या समक्ष तयार केलेले हमी पत्र (शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे रु.१००/- स्टँम्प पेपरवर)

१०. संबंधितांचे शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकित प्रती (साक्षांकीत केलेल्या)

११. जात वैधता प्रमाणपत्राची प्रत (राखीव प्रवर्गासाठी)

कळावे.

आपला विश्वासू ,

Sd/-
(ग.ना.पवार)
उपकुलसचिव
व्याख्याता मान्यता विभाग

प्रत - माहितीसाठी :

१. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव.

२. मा. उपकुलसचिव, कुलगुरू कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव.

३. मा. सहा. कुलसचिव, प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव.